# <u>प्रेसनोट</u> दि. १८/०३/२०२५

**अँन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून प्राथमिक आरोग्य केंद्र, तळेगाव दाभाडे, जि. पुणे येथील वैद्यकिय अधिकारी यांना लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेतलेबाबत.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | तळेगांव दाभाडे पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड आयुक्तालय, पुणे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ अन्वये |
| तक्रारदार | पुरुष, वय ३५ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. उन्मेष सोपान गुट्टे, वय ५४ वर्ष, पद - वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, तळेगांव दाभाडे, पुणे. (वर्ग-३, गट ब) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- (पाच हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी रक्कम | ५,०००/- (पाच हजार) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- (पाच हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | १८/०३/२०२५ |
| सापळा दिनांक | १८/०३/२०२५ रोजी |
| ठिकाण | प्राथमिक आरोग्य केंद्र, तळेगांव दाभाडे, पुणे. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. विजय पवार, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ८६०५००११९६) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदाराचे मित्र अभिषेक यास त्याच्या वडीलांकडून कुलमुखत्यारपत्र तयार करुन घ्यायचे असून, त्या कामासाठी मित्र अभिषेक याने तक्रारदारास अधिकारपत्र दिले असल्याने, मित्राचे वतीने तक्रारदार हे रजिस्टर ऑफिसला अर्ज देण्यासाठी गेले असता, कुलमुखत्यारपत्र करण्यासाठी तक्रारदाराचा मित्र अभिषेक व त्याचे वडील दोघेजण हजर राहणे आवश्यक असल्याचे त्यांना रजिस्टर कार्यालयामधुन सांगण्यात आले. परंतू अभिषेकचे वडीलांना ब्रेन हॅमरेज झाल्याने ते बेडवर झोपून असून, त्यांना कोणतीही हालचाल करता येत नाही. त्यामुळे सदरचे कुलमुखत्यारपत्र बनवण्याच्या प्रक्रियेकरीता रजिस्टर कार्यालयात त्यांना हजर राहता येणार नाही असे कळविल्यानंतर अभिषेकच्या वडीलांच्या आजाराबद्दल शासकिय वैद्यकिय प्रमाणपत्र लागेल असे सांगण्यात आले. त्यानंतर तक्रारदार हे अभिषेकच्या वडीलांचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळविण्याकरीता लोकसेवक डॉक्टर उन्मेष गुट्टे यांना भेटले असता, लोकसेवक डॉक्टर उन्मेष गुट्टे यांनी अभिषेकच्या वडीलांचे आजाराबद्दल वैद्यकीय प्रमाणपत्र देण्याकरीता तक्रारदाराकडे ५,००० (पाच हजार) रुपयाच्या लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार दि. १७/०३/२०२५ रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.बि. पुणे येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. १८/०३/२०२५ रोजी लोकसेवक डॉक्टर उन्मेष गुट्टे यांचेकडे पंचासमक्ष पडताळणी केली असता, त्यांनी तक्रारदाराकडे वरील नमुद काम करण्यासाठी ५,००० (पाच हजार) रुपयाची लाच मागणी करुन, ती लाच रक्कम आज रोजी त्यांच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, तळेगांव दाभाडे येथे तक्रारदाराकडून पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध तळेगांव दाभाडे पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड आयुक्तालय येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

**लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.**

१) **अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३**
२) **व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००**
३) **ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in**
४) **वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in**
५) **ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in**

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.